# वारकरी संप्रदायाचा समाजावर पडलेला प्रभाव

डॉ. शेप बाबासाहेब केशवराव
इतिहास विभागप्रमुख , वैद्यनाथ कॉलेज , परळी - वै. ता.परळी -वै जि.बीड.



**प्रस्तावना:-**

मानवी जीवनात धर्माला महत्वपूर्ण स्थान आहे. इतिहासात विविध पंथ व संप्रदाय निर्माण होऊन त्यांनी भक्तीबरोबरच सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य अव्याहतपणे चालू ठेवले आहे. मध्ययुगीन काळात अशा अनेक पंथ व संप्रदायांनी जनजागृतीचे कार्य केले. मानवतावादी दृष्टिकोणातून त्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. या विविध संप्रदायांनी व त्या संप्रदायांतील विविध भागांतील संतांनी समाजपरिवर्तनाचा पायाच घातला. या परिवर्तनासाठी संतांनी आपल्या ओजस्वी वाणी व साहित्याच्या माध्यमातून एकप्रकारे विद्रोहच केला. त्या अनुषंगाने इतिहास म्हणजे माणसाच्या मनातील सत्प्रवृत्तींच्या विकासाला चालना देणा-या संत-महंतांच्या प्रयत्नांची कहाणी होय. ही डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची व्याख्या एकांगी वाटत असली तरी त्यातून संतांच्या कार्याचे खरे मोल कळते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१ वारकरी संप्रदायाचा अर्थ स्पष्ट करणे .
२ वारकरी संप्रदायाचा समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.
३ वारकरी संप्रदायाच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतके:**

१ वारकरी संप्रदाय प्रारंभिक काळापासून अस्तित्वात आहे.
२ वारकरी संप्रदायाचा समाजावर खोलवर प्रभाव आहे.
३ वारकरी संप्रदायाचे सामाजिक कार्य महत्वपूर्ण आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधाकरीता संदर्भान्वयी, वर्णनात्मक व विश्लेषनात्मक पध्दतींचा वापर करण्यात आला आहे.

**भक्तिमार्गांचा उदय:**

भक्ती हा शब्द संस्कृत भज् धातुपासून तयार झाला असून त्याचा अर्थ सेवा करणे असा होतो. परमेश्वराबद्ल निस्सिम प्रेम म्हणजेच भक्ति, हाच सर्व भक्तीपंथांचा व भक्ती चळवळीचा पाया आहे. भक्तिचा अर्थच केवळ एकाच विश्राप्रती समर्पणाची भावना ठेवणे होय. वेबर यांच्या मते, भक्ती हे तत्त्व व ग्रिअर्सन यांच्या मते ऐकेश्वरवाद हे तत्त्व भक्तिपंथाने ख्रिश्चन धर्मापासून उचलले आहे. तर मुस्लीम धर्मातील सुफी संप्रदायापासून भक्तिपंथाचा उदय झाला असे ताराचंद यांच्या सारख्या विद्वानाला वाटते. परंतु हे मत दुरागृहदुषित असे वाटते.

भक्तिमार्गाचा उदय भारतात फार पूर्वीपासून झाल्याचे दिसते. भारतात हिंदूधर्म हा सर्वात प्राचीन धर्म असून त्याचे मुळ सिंधू संस्कृतीपर्यंत जाते. सिंधू संस्कृतीमध्येच प्रथमतः मातृदेवी व पशुपतीनाथ पूजेचा उल्ले्ख सापडतो. भारतात भक्तीमार्गाचा उगम केंव्हा झाला हे निश्चितपणे सांगता येत नाही. ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार करता पाणिनी यांच्या अष्टाध्यायी या व्याकरणपर ग्रंथात भक्तीचा उल्ले्ख सापडतो. त्यापूर्वी वैदीक व उपनिषद साहित्यात सर्वप्रथम परमेश्वरप्राप्ती भक्तीमार्ग चे उपाय सांगितल्याचे दिसतात. ते म्हणजे ज्ञानकांड व कर्मकांड. कालांतराने कर्मकांड व ज्ञानकांड हे ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग व राजयोग या योगशास्त्रीय परिभाषेत ते मांडले. ईश्वरप्राप्तीच्या पर्यायी मोक्षप्राप्तीच्या दृष्टिने सामान्यजनांना अत्यंत सुलभ मार्ग म्हणून भक्तीयोगांला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. निष्काम कर्मयोगाच्या पालनामध्ये सुद्धा मी परमेश्वराचा दास आहे, हा भाव अंतःकरणात असणे नितांत आवश्यक मानण्यात येत असल्याने परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी ज्या चित्तशुद्धीची आवश्यकता असते. ती चित्तशुद्धी करण्याचा सुलभ व श्रेष्ठ उपाय म्हणून भक्तीयोगावर विशेष भर देण्यात येऊ लागला. भागवतपुराण व वैष्णव ग्रंथांतही ज्ञानमार्गांपेक्षा व अष्टांगमार्गापेक्षा भक्ती मार्गाचे महत्त्व अधिक प्रतिपादीत केले आहे. या पार्श्वभुमिवरच मध्ययुगीन महाराष्ट्रात वारकरी संप्रदायांचा उदय झाला .

**भक्ती चळवळीची पार्श्वभूमी:**

मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत धर्माचे स्थान हे श्रेष्ठ बनल्याने त्यात अनेक दोष व दुष्ट प्रवृत्तीही उत्पन्न झाल्या. मध्ययुगीन कालखंडापर्यंत त्यात खूप वाढ होऊन धार्मिक क्षेत्रात अभिजनवर्गाचा हस्तक्षेप वाढून त्यावर त्यांनी पूर्णतः प्रभुत्व मिळवले. त्यामुळे समाजाच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात ही त्यांचे वर्चस्व निर्माण झाले. मनुष्यांमध्ये स्वार्थ, मत्सर, हेवेदावे, प्रतिष्ठेच्या खोटया संकल्पना, दांभिकता व अंहकार या मानवी प्रवृत्ती उसळून आल्या. समाजात परस्परांमध्ये तेढ निर्माण होऊन धर्माच्या नावाखाली मत्सराची आणि द्वेषाची बीजे रोवली गेली. श्रेष्ठ कनिष्ठतेची उतरंड निर्माण झाली. समाजात विषमतेची दुही पसरली. चातुवर्ण्य व्यवस्थेची शकले उडून ती कर्माऐवजी जन्माधारीत झाल्यामुळे समाजात दुफळी माजली. अशा धर्माच्या, जातींच्या, वर्णांच्या, प्रथा परंपरा, अंधश्रद्धाच्या कर्मकांडाच्या बंदिस्त परिस्थितीने संपूर्ण समाज ग्रासला. डॉ. आशिर्वादीलाल श्रीवास्तव भक्ती चळवळीच्या उदयाची दोन कारणे देतात. प्रथम हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणणे ज्यामुळे तो इस्लामी आक्रमणांना तोंड देऊ शकेल. आणि द्वितीय, हिंदू आणि मुस्लिम धर्मांमध्ये समन्वय स्थापित करणे हदेन्ही जमातींमध्ये सौहार्द्रपूर्ण वातावरण निर्माण करणे. त्याची ही कारणे विरोधाभासी अशा स्वरुपाची आहेत.

### महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय:

निरीश्वरवादी जैन व बौद्ध तसेच सगुन परंपरेतील शैव, वैष्णव, वेदांत, भागवत आणि वारकरी संप्रदायापूर्वी झालेल्या विविध संप्रदायांनी घातलेल्या पायावरच मध्ययुगीन महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची स्थापना संत नामदेव यांनी केली. परंतु त्याचा उदय संत ज्ञानेश्वर व निवृत्तीनाथ यांच्यापासूनच होतो. वारकरी संप्रदायातील बहुसंख्य संत हे मराठवाडा विभागातील असल्यामुळे त्याला मराठवाडा चळवळ असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.वारकरी संप्रदाय ह वारकरी ,माळकरी, भागवतपंथ, विठ्ठल संप्रदाय तसेच पंढरपूर चळवळ म्हणूनही ओळखला जातो. मुळात वारकरी संप्रदायाचा उगम पुंडलिक या श्रेष्ठ भागवत भक्तापासून झाल्याचे मानतात पुंडलिकाच्या भक्तिला लुब्ध होऊन द्वारकाधिश श्रीकृष्ण पंढरीस आले व त्याने दिलेल्या विटेवर उभे राहिले अशी कथा आहे. पंढरपूर क्षेत्र आणि पांडुरंग अस्तित्त्वाचे पुरावे शिलालेख व ताम्रपटातही मिळतात. पंढरपूरच्या चौ-याऐंशीच्या ८४ शिलालेखात यादवांचा मुख्य प्रधान हेमाद्रीपंडीत व नृपती रामदेवराय यादव यांनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरझ्लिा देणग्या दिल्याचे पुरावे सापडतात. मालूतारण या ग्रंथात पांडुरंग मूर्तीचा इतिहास शालिवाहन शकांच्या प्रारंभापासून आढळतो

वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई व परिसा भागवत ही ब्राम्हण मंडळी सोडली तर. इतर बहुसंख्य संतमंडळी ही खालच्या जातीतीलच आहेत. या संप्रदायाचे तत्त्वज्ञान व आचारनियम हे एक सामान्य माणूस आपले दैनंदिन प्रापंचिक जीवन जगतही पाळू शकत असे. कोणतेही काम करत असताना पांडुरंगाचे नामस्मरण करणे संत तुकाराम महाराज यांनी हे या संप्रदायाचे प्रमुख वैशिष्टय होय. बुद्धीवादी, लोकहितवादी, समन्वयवादी, व्यक्तीवादी व क्रियावादी ही या संप्रदायाची प्रमुख वैशिष्टये राहिली आहेत. ज्ञानेश्वरीचे नियमित वाचन करणे, हरिपाठ म्हणणे, व विठ्ठल स्मरणात प्रपंचातील कामे प्रामाणिकपणे पार पाडणे. असे साधारण त्यांचे आचारनियम होत. वारकरी संप्रदायाने विद्वत्तेचे अवडंबर न माजवता समाजातील अंधश्रद्धा व भोळसरपणा घालवला. धर्माच्या नावाखाली दांभिक आचरण करणा-यांचा निषेध केला. वेदकालीन प्रवृत्तीमार्ग व उपनिषदातील निवृत्तीमार्ग यांचे अंधानुकरण न करता त्यातील सारभूत गोष्टी या पंथाने स्विकारल्या.

### मानवतावादी दृष्टीकोणातून ऐक्य:

तत्कालीन मध्ययुगीन भारत हा दोन ध्रुवांप्रमाणे दोन धर्मात विभागला होता. एका बाजुला मुस्लीम समुदाय जो विजेता असल्यामुळे त्या अभिवेषात होता तर, दुसरीकडे हिंदू जो पराजयामुळे अंतरमनातून खचत चालला होता. त्यात मुस्लीम धर्मातील कट्टरवादी उलेमा वर्ग या दोन समुदायांतील दरी वाढवण्याचा व खाल करयाचा प्रयत्न करत होता. अशा परिस्थितीत संतांनी समाजात एह्यढयभाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. त्याचा परीणाम दोन्ही समुदायातील कट्टरवादी धर्ममार्तडांवर भलेही झाला नसेल, परंतु सामान्यजनांमध्ये संतानी रुजवलेल्या मानवतावादी विचारांचे बीज कायम रुजले व त्यांनी ईश्वर व अल्ल ही त्या परमेश्वराचीच रुपे आहेत व ती एकच आहेत ही भावना वाढीस लागली.

### जातीव्यवस्थेला विरोध व अस्पृश्यता निवारण:

वारकरी संप्रदाय हा कोणा एका जातीपुरता मर्यादीत नव्हता तर, या संप्रदायाने सर्व जातीधर्मातील लोकांना भक्तीचा मार्ग मोकळा करुन दिला अठरापगड जातींचे संत भेदभाव विसरुन एका भक्तीच्या छत्राखाली आल्याने शेकडो वर्षे सामाजिक विषमतेच्या चटक्यांनी होरपळून गेलेल्या समाजात एक प्रकारचे नवचैतन्य र्मिाण झाले. भा.प.बहिरट म्हणतात, संतांनी जाती मोडण्याची चळवळ केली नाही तर, जातींचा ज्या वर्णांच्या गटात समावेश होतो ती वर्णव्यवस्थाच समाज रचनेतील समाजस्वास्थ्यासाठी चालत आलेली व्यवस्था आहे हे ओळखून त्यातील मुरलेला निचोच्च भावाचा दोष काढून टाकण्याचा प्रयत्न केला. तर, गं.बा. सरदार म्हणतात शास्त्रप्रामाण्यास व जातीव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्री शुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करुन दिला. संत नामदेव यांनी अश्पृश्य ख्वोखोबा यांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना विठ्ठल मंत्राचा उपदेश केला होता तत्कालीन समाजव्यवस्थेत ही बाब खूप मोठी होती. म्हणून श्री बारटक्के संत नामदेव यांना महाराष्ट्रातीलच नव्हे तर, संपूर्ण भारतातील प्रथम अश्पृश्योद्धारक असे म्हणतात.

### कर्मकांडाला विरोध:

वारकरी संप्रदायाचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्टय म्हणजे कर्मकांडाला विरोध होय. तत्कालीन समाजात कर्मकांड, व्रत्तवैकल्ये व बाहय अवडंबराला उत आला होता. खरा धर्म बाजुला राहून लोक कर्मकांड, अनिष्ट प्रथा परंपरा, अंधश्रद्धांनाच धर्म मानून त्याचे पालन करु लागले. संत नामदेव म्हणतात, व्रततप न लगे करणे, न लगे तुम्हा तीर्था जाणे, तर संत एकनाथ म्हणतात, केले काय तुवा जाउनिया तिर्था। सर्वथा विषयाशी भुलालाशी। वरी दिसशी शुध्द। अंतरी मलीन।। याचा अर्थ असा की तृष्णा, कामभावना, विषयाशी भुललेल्यांनी किती ही तीर्थयात्रा,पुजा पाठ केले तरी ते फक्त त्यांचे वरवरचे दिसनारे रुप असते परंतु अंतःकरणातून ते मलिन, ग्रासलेले आसतात म्हणून संत नामदेव व एकनाथांसारखी संत मंडळी अंतःकरणाच्या शुध्दतेवर भर देतांना दिसतात.

**बोलीभाषेला महत्व:**

संतानी पंडीती भाषेच्या अवडंबराला छेद देऊन आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी स्थानीक भाषांचा वापर केला संत ज्ञानेश्वर यांनी संस्कृतमधील भगवद्गीता भावार्थदीपीका या नावाने मराठीत भाषांतरीत केली. त्यामुळे सामान्यांना भगवद्गीतेतील ज्ञानाची दारे खुली झाली. ज्ञानदेव म्हणतात, माझा मराठाचि बोलु कौतुकें , परि अमृतातें पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके, मेळवीन ही प्रतिज्ञा बंदीस्त ज्ञान जनसामान्यांपर्यंत तेवढयाच योग्यतेने पोहचविण्याचा आत्मविशवास व्यक्त करणारी अशीच आहे.

**निष्कर्ष:**

भक्ती आंदोलनातील संतांच्या कार्यामुळे पुर्वीपासून चालत आलेल्या जाचक धार्मिक कर्मकांडाची मूठमाती होण्यास मदत झाली. या संप्रदायाने समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, रुढी, प्रथा, परंपरा याना कडाडून विरोध करुन मानवाला सरलतेचा मार्ग दाखवला.या आंदोलनामुळे धार्मिक विधी, पूजा सरळ-सोपी होण्यास मदत झाली. या संप्रदायाने स्त्री-पुरुष समांनतेची, उच्च-निच्च भेदवाव न पाळण्याची आणि नैतिक मुल्यांची जोपासना करण्याची शिकवण दिली. वारकरी संप्रदायामुळे जनसामान्याच्या बोली भाषेचा विकास होण्यास मदत झाली व समता प्रस्थापीत झाली वारकरी सम्प्रदायात सर्व जाती जमातीच्या लोकांचा सहभाग होऊन विविध पंथाची निर्मिती झाली. तसेच ईश्वर हा एक आहे हे भारतीय समाजाला वारकरी संम्प्रदायांने पटवून दिले. त्यांमुळे ईश्वराच्या आराधना वाढीस मदत झाली. वारकरी संम्प्रदायामुळे वर्णभेद, जातीभेद, अस्पृश्यता व अनिष्ठ रुढी-परंपरा नष्ट होण्यास मदत झाली. संतानी जनसामान्यांना नैतीक अचरणावर भर देण्याची शिकवण दिल्याने परमेश्वराविषयाच्या अंधश्रध्देचे उच्चाटन होण्यासही मदत झाली.

**संदर्भ:**

१. मेणसे,कृष्णा'श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर: एक चिंतन', लोकवाड्मय संग्रह, मुबई,१९९९.
२. डॉ. फडकुले,'निर्मलकुमार, 'संत साहित्य सौंदर्य आणि सामर्थ्य*, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००५.
३. भावळकर, तारा'भक्ति आंदोलनाची भावभूमी', ज्ञानमोचक दीपावली अंक वर्ष २, अंक ८.
४. वर्मा, हरिश्चंद्र,'मध्ययुगीन भारत का इतिहास, भाग१' दिल्ली विश्वविद्यालय, २००५.
५. डॉ. वर्णेकर, श्री भा.'भारतीय धर्म व तत्त्वज्ञान', म.वि. ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे.
६. सरदार,गं.बा.'संत वाड्मयाची सामाजिक फलश्रुती', महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे,१९७०.
७. डॉ. कठारे, अनिल,'डॉ. नगराळे, 'मराठवाडयाचा इतिहास,' कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर, नांदेड,१९९९.
८. डॉ. तुळपुळे शं. गो., पाच संत कवी,
९. गुप्ता, आर. के., 'मध्यकालीन समाज धर्म, कला एवं वास्तुकला', पॉईन्टर पब्लिशर्स, जयपूर.
१०. भिडे, गजानन,'प्राचीन भारतीय राजकीय व धार्मिक संस्था', फडके प्रकाशन कोल्हापुर, आवृत्ती १९८९.
११. महाजन, व्ही.डी,'मध्यकालीन भारत', एस.चांद,ॲण्ड कंपनी लि. नई दिल्ली २००३
१२. मोकाशी, प.रा.'महाराष्ट्रातील पाच संम्प्रदाय', प्रसाद प्रकाशन पुणे.